महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१
दुरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२११८/२२२३२२, फॅक्स क्रमांक ०२१४१ २२७४५१,
Email dcraigad@gmail.com

**(गृह शाखा) क्र.गृह/एमएजी-१/वाहतूक बंद/आंबेनळी घाट/२०२६** **दि.१०/०८/२०२६**

**वाचले :-**

१. मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम ११५ व ११६.
२. शासन, गृह विभागाकडील अधिसूचना क्र. एमव्हीए०५८९/सीआर-१०६१-टीआरए-२, दि.१९/०५/१९९०.
३. या कार्यालकडील आदेश क्र.गृह/एमएजी-१/वाहतूक बंद/आंबेनळी घाट/२०२६, दि.०७/०७/२०२६.
४. तहसिलदार पोलादपूर यांचेकडील पत्र क्र.फौजदारी /कात-२/पोलादपूर -महाबळेश्वर मार्ग/२०२६, दि.०६/०८/२०२६
५. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुबई यांचेकडील दि.०६/०८/२०२६ रोजीचे पत्र.
५. या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दि.१०/०८/२०२६.

-------------------------------*******************-----------------------------------

## वाहतूक बंदी अधिसूचना

ज्याअर्थी, तहसिलदार पोलादपूर यांनी कळविल्यानुसार उपोद्घातातील अ.क्र.३ कडील आदेनशान्वये, पोलादपूर महाबळेश्वर (आंबेनळी घाट) रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही दुर्घटना टाळण्याच्या अनुषंगाने दि.०७/०७/२०२६ ते दि. ३१/०७/२०२६ या कालावधीत सर्व प्रकारच्या वाहतूकीसाठी पूर्णपणे बंद करणेबाबतआदेश जारी करण्यात आलेले होते.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुबई यांनी तहसिलदार पोलादपूर यांचेकडे केलेल्या विनंतीनुसार, सदर मार्गावर महामंडळाकडून आवश्यक ती संरक्षणात्मक कामे, दरड हटविणे, ड्रेनेजची देखभाल, रिटेनिंग स्ट्रक्चरची दुरुस्ती व इतर आवश्यक सुरक्षा उपाय सातत्याने करण्यात येत असले तरी नैसर्गिक आपत्तीजन्य घटना मानवी नियंत्रणाबाहेर असल्याने सार्वजनिक जीवित व मालमत्तेच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असून तसेच भारतीय हवामान विभागानेही पुढील काही दिवस अतिवृष्टीचा इशारा दिलेला असून घाट परिसरातील भौगोलिक परिस्थिती विचारात घेता, कोणत्याही क्षणी गंभीर अपघात अथवा जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलादपूर-आंबेनळी- महाबळेश्वर राज्य महामार्ग (SH-१३९) वरील दि.१६/०८/२०२६ पर्यंत सर्व प्रकारच्या वाहतूकीसाठी बंद ठेवण्याबाबत आदेश निर्गमित होणेबाबत तहसिलदार पोलादपूर यांनी संदर्भिय क्र.४ कडील पत्रान्वये या कार्यालयाकडे विनंती केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, तहसिलदार पोलादपूर यांनी केलेल्या विनंतीनुसार महाबळेश्वर (आंबेनळी घाट) रस्त्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीही दुर्घटना टाळण्याच्या अनुषंगाने या आदेशाचे दिनांकापासून ते दि.१६/०८/२०२६ या कालावधीत सर्व प्रकारच्या वाहतूकीसाठी पूर्णपणे बंद करणेबाबत माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, **मी, किशन ना.जावळे**, जिल्हादंडाधिकारी रायगड उपोद्घातातील अ.क्र.१ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार **पोलादपूर महाबळेश्वर (आंबेनळी घाट) रस्ता सुरक्षिततेच्या** दृष्टीने कोणतीही दुर्घटना टाळण्याच्या अनुषंगाने **या आदेशाचे दिनांकापासून ते दि.१६/०८/२०२६** या कालावधीत सर्व प्रकारच्या वाहतूकीसाठी पूर्णपणे बंद करणेबाबतआदेश जारी करीत आहे.

DISTRICT MAGISTRATE
जिल्हा दंडाधिकारी
RAIGAD-ALIBAG

सही/-XXX
**(किशन ना.जावळे)**
**जिल्हादंडाधिकारी रायगड**

प्रत:- मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
प्रत:- जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे/सातारा/रत्नागिरी यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांजकडे आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत:- पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, रायगड परिक्षेत्र यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- उपविभागीय दंडाधिकारी महाड/माणगांव/श्रीवर्धन/रोहा यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, मुबई यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

प्रत:- कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार महाड/पोलादपूर/माणगांव/श्रीवर्धन/म्हसळा/रोहा/तळा यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ पेण, रामवाडी, ता.पेण, जि.रायगड यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत:- आदेश संचिका.

**(संदेश शिर्के)**
**अपर जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**